नितीन गडकरी

विरोधी पक्ष नेता * महाराष्ट्र विधान परिषद *

दूरध्वनी क्र. कार्यालय २२०२ ८८ १६, २२०२ ३५ ५३
निवास २३६३ २२ १३, २३६३ २८ १९

विधान भवन, मुंबई ४०० ०३२
नागपूर ४४० ००१

दिनांक :

# शब्दाला जागणारा जीवलग मित्र
## — नितीन गडकरी

नानीक रूपानी हे एक अत्यंत प्रेमळ व्यक्तिमत्व आणि समाजाचा विकास करण्याच्या ध्येयाने धडपडणारा जवळचा मित्र म्हणून मला परिचित आहेत. नानीक रूपानींचं वैशिष्टय म्हणजे जगभरातील असंख्य विविध क्षेत्रातील मान्यवर हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. जपान असो, ऑस्ट्रेलिया असो, अमेरिका, इंडोनेशिया, मलेशिया वा चीन असो, जगभरातील असंख्य ठिकाणी त्यांचे अगणित मित्र आहेत. एखाद्या व्यक्तिचा एवढा मित्रपरिवार असणं हे निश्चितपणे आश्चर्यकारक आहे आणि माझ्यासारख्या त्यांच्या एका जवळच्या मित्रासाठी हे अभिमानास्पद देखील आहे.

नानीक रूपानींच्या स्वभावाचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांनी नेहमी चांगल्या गोष्टींना पूर्णपणे पाठिंबा दिलेला आहे. मला आठवतं प्रियदर्शनी पुरस्कार देण्याच्या वेळेस त्यांनी समाजातील अतिशय उत्तम कार्य करणाऱ्या लोकांना प्रोत्साहन मिळेल याची काळजी घेतली आहे. दुसऱ्याच्या स्वभावातील कर्तृत्व, चांगुलपणा नजरेस आल्यानंतर त्याला दिलखुलासपणे दाद देणं हा त्यांचा स्वभावगुण आहे.

महाराष्ट्रात युतीचं सरकार असताना मला आठवतंय माझ्यावर बांधकाम खात्याची जबाबदारी होती. त्या कालावधीत मी रस्त्याची जी कामं करत होतो, मुंबईतील पूल बांधून वाहतुकीचा प्रश्न मोठया प्रमाणात मार्गी लावण्यासाठी तातडीने निर्णय घेत होतो, मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवे ठराविक वेळेत तयार करण्यासाठी ज्या योजना कार्यान्वित करत होतो त्या सगळयाबद्दल त्यांना कौतुक होतं. त्यांनी अनेक वेळा तसं सांगितलं देखील. त्याच दरम्यान प्रियदर्शनी पुरस्कारासाठी माझं नाव सुचवण्यात आलं होतं. मात्र त्या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचा दिवस आला त्यावेळेस मी विरोधी पक्षनेता होतो.

.....२..

नितीन गडकरी

विरोधी पक्ष नेता
महाराष्ट्र विधान परिषद

दूरध्वनी क्र. कार्यालय २२०२ ८८ १६
२२०२ ३५ ५३
निवास २३६३ २२ १३
२३६३ २८ १९

विधान भवन, मुंबई ४०० ०३२
नागपूर ४४० ००१

दिनांक :



त्यावेळेस सत्तारूढ पक्षातील सदस्यांनी त्यांना असं सुचवून पाहिलं की आता विरोधी पक्षनेत्यास पुरस्कार दिला तर राज्य सरकारमधील राजकीय नेत्यांना त्याबद्दल वेगळा संदेश जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता हा पुरस्कार गडकरींना दिला जाऊ नये. मात्र त्या वेळेस रूपानींनी कोणाचंही ऐकलं नाही. खरंतर त्यावेळेस नानीक रूपानी सत्तारूढ पक्षाशी जवळकीचे संबंध ठेवून होते आणि माझे मात्र तितकेसे चांगले संबंध सत्तारूढ पक्षाशी नव्हते. नानीक रूपानींवर त्यावेळी दबाव आणण्याचा प्रयत्नही केला गेल्याचं मला कळलं. मात्र नानीक रूपानी आपल्या निर्णयावर ठाम राहिले. इतकच नव्हे तर त्यांनी असंही सांगितलं की, कोणाची नाराजी पत्करावी लागली तरी चालेल पण मी गडकरींनाच हा पुरस्कार देणार.

असा हा प्रेमळ मित्र. दुसऱ्याचा आदर करणारा, विकासाच्या मुद्यावर कधीही तडजोड न करणारा आणि मैत्रीसाठी, दिलेल्या शब्दासाठी, कोणत्याही दबावाला बळी न पडता जागणारा अशा या जीवलग मित्राला उदंड आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

— **नितीन गडकरी**
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद
तथा
अध्यक्ष, महाराष्ट्र भाजपा प्रदेश